# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या
अॅपेलेट ऑथॉरिटीसमोर

अपिल क्रमांक १०/२०११

सुनावणी दिनांक १४/०९/२०११

श्री किशोर बापूराव टाकणे
सह्याद्री को.ऑप.हौ.सोसायटी,
बी.नं.सी-२, रुम नं.२/३, ८ बी,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४

अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
मुंबई

प्रतिवादी

## आदेश

अपिल करणार यांनी मूळ अर्ज दिनांक २५/७/२०११ रोजी माहिती अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, दुसरा मजला, कल्पतरु पॉईंट , सायन, मुंबई यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे दिलेला होता व त्यामध्ये श्री अजित सराफ यांची मा.राज्य माहिती आयुक्त यांनी अपिल क्र.४८९७ प्रकरणी दिनांक ३०/५/२०११ रोजी दिलेल्या आदेश क्र.१ बाबत चौकशी अधिकारी म्हणून केलेल्या नेमणुकीबाबत, माहिती मागितलेली होती. कारण, श्रीयुत सराफ, चौकशी अधिकारी यांच्यासमोर श्रीयुत शि.रा.बानाटे, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांच्याबाबत दिनांक २६/०७/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली होती. त्यामुळे श्री सराफ यांच्याबाबतची माहिती २४ तासांच्या आत उपलब्ध करुन देण्याबाबत अपिल करणार यांनी अर्ज केलेला होता.

सहाय्यक माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, जरी अपिल करणार यांनी आवक मध्ये दिनांक २५/७/२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता माहिती अधिकार अधिनियमांतर्गत २४ तासांच्या आत श्री सराफ यांच्याविषयी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत अर्ज केलेला होता, तरीसुध्दा माहिती अधिकारी यांच्याकडे तो दिनांक २५/७/२०११ रोजी दुपारी १२.३० वाजता उपलब्ध झाला व त्यानंतर त्वरीत लंचनंतर दुपारी

२.०० वाजता वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांच्याकडे तातडीने पाठविण्यात आला व माहिती मागविण्यात आली. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक २६/७/२०११ रोजी दुपारी २.०५ मिनीटांनी एकुण १०५ पानांची माहिती, माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करुन दिली. सदरहू माहिती वेळेत उपलब्ध करुन दिल्यामुळे, रु.२१०/- ही फोटोकॉपीची रक्कम अपिल करणार यांच्याकडून त्याचदिवशी घेण्यात आली.

अपिल करणार यांना दुपारी ३.०० वाजता श्री सराफसाहेब यांच्याकडे वरील बाबतीत सुनावणी असल्यामुळे माहिती तत्पूर्वी मिळाल्यामुळे, त्याबाबत तक्रार नाही. मात्र अपिल करणार यांनी अपिलाच्या सुनावणीच्या वेळी खालील त्रुटी माहितीमध्ये असल्याचे स्पष्ट केले.

१. मुद्दा क्र.१ - श्री अजित सराफ हे धारण करीत असलेल्या सह संचालक(जल प्रदूषण निवारण) या पदनामाबाबत कोणतेही शासन मंजुरीचे पत्र/शासन निर्णय आस्थापना विभागाने उपलब्ध करुन दिला नाही. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असणारे ६२६ नवीन पदे मंडळाच्या आस्थापनेवर निर्माण करण्याबाबत पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त झालेले दिनांक २०/८/२००९ चे पत्र उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यामध्ये सह संचालक (ज.प्र.नि.) या पदाचा उल्लेख नसल्याचे दिसून येते.

   वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी सह संचालक (ज.प्र.नि.) या पदाबाबत त्यांच्याकडे उपलब्ध असणारी शासन मंजुरीबाबतची माहिती दिनांक १९/०९/२०११ रोजीपर्यंत उपलब्ध करुन द्यावी, कारण श्री सराफसाहेब हे दिनांक ३०/०९/२०११ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. तसेच अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की, त्यांना दिलेल्या माहितीतील पान क्र.६ ते ८ ही गैरलागू माहिती आहे.

२. मुद्दा क्र.२ मध्ये अपिल करणार यांनी १९९९ पासून श्री सराफ यांना कितीवेळा निलंबित करण्यात आले, त्याबाबत निलंबनाच्या संबंधातील मप्रनि मंडळाची कार्यालयीन टिप्पणी आणि तक्रारी इत्यादी प्राप्त न झाल्याचे स्पष्ट केले. आस्थापना शाखेने वरील माहिती लवकरांत लवकर उपलब्ध करुन द्यावी, असे अपिलीय अधिकारी स्पष्ट करीत आहेत.

३. मुद्दा क्र.३ बाबत आस्थापना शाखेने चौकशी अधिकारी नेमण्याची कार्यालयीन टिप्पणी उपलब्ध करुन दिली नसल्याचे स्पष्ट करण्यात आलेले आहे. सदरहू माहिती आस्थापना शाखेने लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी

४. मुद्दा क्र.४ मधील मंडळाच्या १४९ व्या बैठकीतील बाब व त्यावरील इतिवृत्ताची प्रत दिलेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. सदरहू माहिती आस्थापना शाखेने लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी

५. मुद्दा क्र.५ बाबत जरी श्री अजित सराफ यांच्या पदोन्नतीबाबत आदेश जोडले असले तरी त्याबाबतची कार्यालयीन टिप्पणी व त्यांना कशा प्रकारे पदोन्नती दिली हे स्पष्ट केलेले नाही. तसेच अपिल करणार यांना दिलेल्या माहितीतील पान क्र.५८ नंतर सदस्य सचिव यांच्या नावासमोर करण्यात आलेल्या नोटींगवर कोणाचीही सही नसल्याचे आढळून येते. तसेच पान क्र.६८ नंतर जरी पान क्र.६९ दिलेले असले तरी सुध्दा मूळ नस्तीच्या पान क्र.१३ नंतर थेट पान क्र.१७ दिलेले आहे. दरम्यानच्या काळात पान क्र.१४ ते १६ उपलब्ध नसल्याचे दिसून येते. ज्यामध्ये पान क्र.१५ उपलब्ध नसल्याचे दिसून येते. सदरहू माहिती आस्थापना शाखेने लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी.

६. मुद्दा क्र.६ मध्ये श्रीयुत सराफसाहेब यांना १९९९ नंतर केवळ एकच वेतनवाढ दिल्याचे आदेश प्राप्त आहेत. इतर वेतनवाढीबाबत स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे. सदरहू माहिती आस्थापना शाखेने लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी.

अपिल करणार यांनी असे निदर्शनास आणले की, आजपर्यंत त्यांना आस्थापना शाखेने कधीही वेळेवर संपूर्ण माहिती दिलेली नाही. त्यामुळे त्यांना वारंवार प्रथम अपिलीय अधिकारी आणि द्वितीय अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल दाखल करावे लागते. अपिलामध्ये लवकरात लवकर किंवा ठराविक दिवसांत उर्वरित माहिती द्यावी असे आदेश होतात. मात्र, आस्थापना शाखेकडून जाणुनबूजुन त्याचे पालन होत नाही. अपिल करणार यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, वरील माहिती अर्धवट दिल्यामुळे त्यांना २६/७/२०११ रोजीच्या सुनावणीमध्ये त्या माहितीचा कोणताही उपयोग झाला नाही.

अपिलीय अधिकारी म्हणून वरीलप्रमाणे आस्थापना शाखेने वेळोवेळी माहिती न दिल्यामुळे व प्रत्येक वेळी प्रथम अपिलाच्या वेळेस माहिती दिल्यामुळे, या कार्यालयाचा बहुतांश वेळ आस्थापना शाखेने न दिलेल्या माहितीसंदर्भातील आदेश निर्गमित करण्यामध्ये खर्च होत आहे. तरी यापुढे आस्थापना शाखेने माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा वरिष्ठ अधिकारी यांनी याबाबत आस्थापना शाखेस कडक निर्देश देणे गरजेचे आहे. याकरिता या आदेशाची प्रत सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांच्याकडे सादर करण्यात येत आहे.

येणेप्रमाणे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक १४/९/२०११ रोजी मुंबई येथून,

( द. त्रि. देवळे )
अपिलीय अधिकारी